www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १५० वा शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514



**दैनिक युवक आधार**
राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीशभाऊ महाजन यांची तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष मा.आनंद पवार यांनी सदिच्छा भेट घेतली. मंगळवार दि.११ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात सदिच्छा भेट घेऊन त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रज्ञासुर्य हा विशेषांक भेट देवून संघटने विषयी संघटनात्मक चर्चा करण्यात केली.

# मणिपूरमध्ये CRPF जवानाचा आपल्या साथीदारांवर अंदाधुंद गोळीबार, तिघांचा मृत्यू

एकीकडे मणिपूर राज्यात राष्ट्रपती शासन लागू झाले आहे, तर दुसरीकडे येथील **CRPF** कॅम्पमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका सैनिकाने आपल्या साथीदारांवर अंदाधुंद गोळीबार केला, ज्यात 3 जवानांचा मृत्यू झाला, तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना इंफाळ पश्चिम जिल्ह्यातील लामफेल येथील सीआरपीएफ कॅम्पमध्ये आज(13 फेब्रुवारी) रात्री 8.20 वाजता घडली. आरोपी सैनिक संजय कुमार हा 120व्या बटालियनचा सार्जंट होता. त्याने



अचानक आपल्या सर्व्हिस रायफलमधून गोळीबार सुरू केला. यानंतर आरोपीने स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली. या हल्ल्यात इतर आठ जवानही जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तात्काळ इम्फाळ येथील रिजनल इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस (**RIMS**) मध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या या गोळीबाराचे कारण समजू शकलेले नाही. सीआरपीएफच्या अधिका-यांनी सांगितले की, या घटनेचा तपास सुरु असून त्याची कारणे लवकरच समोर येतील. सीआरपीएफचे वरिष्ठ अधिकारी कॅम्पमध्ये पोहोचले असून परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू-केंद्र सरकारने गुरुवारी मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. 9 फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी राज्यपालांकडे राजीनामा सुपूर्द केला होता. मनीपूरमध्ये 21 महिन्यांपासून सुरू असलेल्या जातीय हिंसाचारामुळे 300 जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळेच बिरेन सिंह यांच्यावर राजीनामा देण्यासाठी खूप दबाव होता. विरोधी पक्षानेही या मुद्द्यावरुन भाजपला धारेवर धरले होते. अखेर मुख्यमंत्र्यांची नियुक्ती न केल्याने केंद्र सरकारकडून मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.



**दैनिक युवक आधार -** सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने उल्लेखनीय सेवेचा गौरव म्हणून समाजसेवक विजय भोसले यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार मुंबई विद्यापीठ चे कुलगुरू भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

# ठाण्यात अल्पवयीन मुलीवर मित्रानेच केला अत्याचार,मुलीची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर/ठाणे ता १३** : ठाण्यात मित्रानेच अत्याचार केल्याने अल्पवयीन मुलीने आत्महत्याकेल्याची घटना घडली आहे. एका १७ वर्षीय मुलीवर तिच्याच १७ वर्षीय मित्राने अत्याचार केल्यानंतर आपण गरोदर राहिल्याचा तिचा समज झाला. त्याची जबाबदारी या मित्राने झटकल्यानंतर आलेल्या नैराश्यातून या पीडित मुलीने घरातच आत्महत्या केल्याची घटना कासारवडवलीतील येथे घडली आहे. अल्पवयीन मुलाविरुद्ध पोक्सो, आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून त्याला बुधवारी ताब्यात घेतल्याची माहिती वपोनि



सुनील पाटील यांनी दिली आहे.ठाण्यातील कासारवडवली भागात राहणाऱ्या पीडित मुलीचे कोलशेत भागात राहणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाबरोबर मैत्रीचे संबंध होते. त्यांच्यात जवळीक वाढल्यानंतर त्याने महिनाभरापूर्वी तिच्यावर अत्याचार केले. त्यातून ती गरोदर राहिल्याचा तिचा समज झाला. एक महिन्यांची गरोदर असल्याचे तिने या मुलाला सांगितले. मात्र, आपण जबाबदारी घेणार नसल्याचे सांगत तो मित्र पसार झाला. तिने त्याचा शोध घेतला. मात्र, तो कुठेच न मिळाल्याने वैफल्यग्रस्त मुलीने ८ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास आपल्याच घरात गळफास घेत आत्महत्या केली.

# एकलव्य नगर विंचूर, किसन वाडी येथे जलकुंभाचे लोकार्पण



**दै युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी जनार्दन चव्हाण -(नाशिक)** : विंचूर पासून जवळच असलेले किसनवाडी येथील एकलव्य नगर येथे जलकुंभ टाकीचे लोकार्पण सरपंच सचिन दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजेंद्र मोरे, वनिता गांगुर्डे, गंगाधर गोरे, गोरख गांगुर्डे, ग्रामपंचायत अधिकारी आर एस धुंडाळे, मुख्य लिपिक राजेंद्र शिंदे, दत्तात्रय खाडे, मिलिंद वाघ, भाऊसाहेब संसारे आणि एकलव्य नगरचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई चा वडापाव गरीबाला झाला महाग

**युवक आधार प्रतीनिधी**
**सुनिल शांताराम पेंडुरकर:**मुंबईत वडापाव खाऊन मोठ मोठे लोक झाले मंत्री झाले कलाकार झाले असे असताना आता वडा पाव खाऊन जगणा-या गोर गरीबाला वडा पाव हा परवडेनासा झाला आहे 10 रु आणि 12 रुपयात मिळणार वडापाव कुठे 20 रूपये तर कुठे 25 रूपये तर कुठे चक्क 50 रुपयाला वडापाव मिळु लागला आहे त्यामुळे गरीबाच्या नशीबात आता वडापाव मिळेनासा झाला आहे तर सर्व सामान्य माणसाला हॉटेलात घुसण्या पुर्वी विचार करण्याची पाळी आली आहे की हॉटेलात जावु की नको कारण साधा वडा सांबर कुठे 90 रुपये तर कुठे 130 रूपये या दरात मिळत आहे आणि बाहेर टपरीवर 10 रूपये चहा तोच चहा हॉटेलात 25 रुपये तर कुठे 50 रूपये या दरात विकला जात आहे हि चाललेली लुट आणि यावर खादय विभागाच नसलेल नियत्रण हे गरीबाला जगु देनार नाही वाढती महागाई पहाता खाद्य विभागाला या वर कायदा आणला पाहीजै आणि हि लुट कुठे तरी थांबली पाहीजे आणि 10 रुपये चहा तर सगळी कडे ऐकच दर झाला पाहीजे तरच कोणी तरी म्हणेल की मी वडापाव खाऊन मुंबई दीवश काढले

# शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतला ज्ञानासोबतच मनोरंजनाचा आनंद

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी -मोहम्मद पिंजारी**:मुरुड परिसरात नामांकित असणाऱ्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश या शैक्षणिक संस्थेची सहल ही हैद्राबाद या ठिकाणी काढण्यात आली होती .संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव सदस्या अश्विनी झाडके यांच्या हस्ते गाड्यांचे पूजन करण्यात आले तसेच मुरुड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला . यावेळी ओम झाडके, रामेश्वरी झाडके मुख्याध्यापक बाबू थॉमस उपमुख्याध्यापक उमेश कुंभार समन्वयक रामेश्वर शेटे तसेच सहलीला येणारे विद्यार्थी व त्यांचे पालकही उपस्थित होते . हैद्राबाद येथील प्रसिद्ध बिर्ला मंदिर , बिर्ला विज्ञान केंद्र , सालारजंग म्युझियम , गोलकोंडा किल्ला , लिंबोनी पार्क , पाण्यावरील लेझर शो व रामोजी फिल्म सिटी आदी ठिकाणे घेण्यात आली होती . या प्रत्येक ठिकाणाला गाईडच्या माध्यमातून भेटी देण्यात आल्या त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात तर भर पडलीच शिवाय त्यांचे खुप मनोरंजनही झाले . विद्यार्थ्यांच्या प्रवासाची , राहण्याची व भोजनाची व्यवस्था उत्तम करण्यात आली होती . विद्यार्थ्यां सोबत शाळेचे मुख्याध्यापक बाबू थॉमस , उपमुख्याध्यापक उमेश कुंभार , समन्वयक रामेश्वर शेटे , क्लेरम्मा जेकप



व शांती मार्डी या शिक्षकांची नेमणुक करण्यात आली होती . दरम्यान प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सहल ही नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यावर नेहण्यात आली होती . शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सहलीत सहभाग घेतला होता . एक अविस्मरणीय अनुभव विद्यार्थ्यांना या शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून घेण्यात आला . तर मुलांमध्ये ऊर्जाही निर्माण झालेली दिसुन येते.

===============

# युवा पर्यावरण संसद'चे आयोजन; आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** पनवेल महानगर पालिका आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्यावतीने 'युवा पर्यावरण संसद'चे आयोजन आज (दि. १३) करण्यात आले होते. खारघर येथे झालेल्या या कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन विधानसभा कामकाजाबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. सकारात्मक चर्चेला महत्व असल्याचे त्यांनी सांगून समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य सर्वांनी बजावले पाहिजे, असे प्रतिपादन केले.जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी आंतर 'महाविद्यालयीन पर्यावरण युवा संसद संपन्न झाली. या संसदेत के. एल. ई कॉलेज, पिल्लेज कॉलेज, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲप्स सायन्स, एस. के कॉलजे नेरुळ आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहाभा घेतला होता. यात विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक गंभीर समस्यांवर चर्चा करून उपाययोजना सुचविल्या. या संसदेत जलसंधारण, प्रदुषण नियंत्रण, हरित उर्जा, जंगलतोड आणि कचरा व्यवस्थापन या महत्वाच्या मुद्यांवर चर्चासत्र झाले. विद्यार्थ्यांनी विविध पर्यावरणीय समस्यांवर आधारित आपली मते मांडली आणि शाश्वत पर्यावरणासाठी उपयुक्त ठरणारे प्रस्ताव सादर







केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेचे संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेचे संचालक संजय भगत, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, पनवेल महानगरपालिकेचे आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर, अयुफ अकुला यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# मनातले शिक्षक"या लेखसंग्रहात शेख अब्दुल रहीम यांचे लेखाची निवड!

## ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सर यांच्या हस्ते शेख अब्दुल रहीम सर यांचा सन्मान!

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर वार्ताहर** -छत्रपती संभाजीनगर येथे दुसरे शिक्षक साहित्य संमेलनात प्रसिद्ध "मनातले शिक्षक" लेखसंग्रहामध्ये शेख अब्दुल रहीम सरांचा लिखित लेख निवडला गेला आहे. शेख अब्दुल रहीम सरांनी त्यांचे जीवनातले आवडते शिक्षकांबद्दल "आदर्श शिक्षक-श्री. नासेर खान पठाण" हे लेख लिहून जिल्हा परिषद , छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाला पाठविले होते. लेखाला "मनातले शिक्षक " या लेखसंग्रहामध्ये स्थान मिळाला होता त्याबद्दल शेख अब्दुल रहीम सर यांनी निवड समिती तसेच संपादक मंडळाचे मनपूर्वक आभार मानले. आज रोजी त्या बद्दल ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तसेच एक उत्कृष्ट सूत्रसंचालक, उत्कृष्ट अधिकारी श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सर यांच्या शुभहस्ते आज शेख अब्दुल रहीम सरांना दुसरे शिक्षक साहित्य संमेलन मध्ये लेख निवडले गेल्याबद्दल तसेच सहभाग बद्दल जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभाग( माध्यमिक) तर्फे सन्मान पत्र, सन्मान चिन्ह आणि "मनातले शिक्षक" हे पुस्तक भेट देऊन सन्मान केले. त्याबद्दल शेख अब्दुल रहीम सरांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या श्रीमती अश्विनी लाटकर मॅम, प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण मॅम तसेच ज्येष्ठ शिक्षण विस्तार श्री. रमेश मुक्ता विठ्ठल ठाकूर सरांचे आभार मानले...



# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार पेण संघाच्या क्रिकेट सामन्याला जिल्ह्यातील पत्रकारांचा उत्स्फूर्त सहभाग

## अटीतटीच्या सामन्यात गोरेगांव प्रेस क्लब संघाने मारली बाजी तर रोहा पत्रकार संघ ठरला उपविजयी

**दैनिक युवक आधार**

**पेण प्रतिनिधि**–महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई संलग्न पेण पत्रकार संघाच्या वतीने रायगड जिल्ह्याच्या सर्व पत्रकार बांधवांसाठी बुधवार ता.१२ फेब्रूवारी रोजी पेण नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर एक दिवसीय भव्यदिव्य क्रिकेट सामान्यांचे आयोजन करण्यात आले होते. भव्यदिव्य अशा झालेल्या क्रिकेट सामन्याला जिल्ह्यातील पत्रकारांचा उत्स्फूर्त असा सहभाग लाभला. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात कोणतेही गालबोट न लागता हे सामने पार पडले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रोहा व गोरेगाव प्रेस क्लब यांच्यातरंगतदार झालेल्या अंतिम सामन्यात १ बॉल ६ रन ची गरज असताना गोरेगांव संघाच्या खेळाडूने षटकार लगावल्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघच्या क्रिकेट सामन्यातील प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले.सकाळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे,कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर,रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे,समीर वारे,पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल,अड. मंगेश नेने,वनविभाग अधिकारी कुलदीप पाटकर,राजुशेठ पिचिका,मुदस्सीर अखवारे,दत्ता कांबळे,आर टी ओ अधिकारी महेश देवकाते,जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे,प्रवीण पाटील,नंदेश पाटील,महावितरणचे अधिकारी श्री.मेश्राम,हरीश बेकावडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पेण अध्यक्ष राजेश कांबळे,उपाध्यक्ष विनायक पाटील,सचिव स्वप्निल पाटील,सहसचिव सुदर्शन शेळके,खजिनदार किरण बांधणकर,सल्लागार दिपक लोके, सहसल्लागार गणेश पाटील,सदस्य रुपेश गोडिवले,मितेश जाधव, प्रशांत पोतदार तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून क्रिकेट सामान्याची सुरुवात करण्यात आली.पेण पोलीस विरुद्ध महावितरण पेण संघ तर




सामाजिक व राजकीय मंडळी व प्रांत,तहसील,वनविभाग कर्मचारी पेण यांच्यात मैत्रीपूर्व सामना खेळवण्यात आला. पनवेल खारघर,अलिबाग,नागोठणे, गोरेगाव,खालापूर रोहा,पेण आदी जिल्ह्यातील पत्रकार तसेच जे.एस. डब्ल्यूचे अधिकारी आत्माराम बेटकेकर,रायगड जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती संजय जांभळे, बाफना ज्वेलर्सचे विशाल बाफना, गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉ.रत्नदीप गवळी,डायरेक्टर रोहन पंदारे, ज्येष्ठ पत्रकार विजय मोकल,पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी तसेच राजकीय, सामाजिक,क्रिकेट प्रेमी यांनी सकाळपासून मैदानावर उपस्थीत राहून खेळाचा मनमुराद आनंद लुटला.

अंतिम सामना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रोहा व गोरेगाव प्रेस क्लब यांच्यात होऊन गोरेगाव प्रेस क्लब संघाने बाजी मारत विजय संपादन करून भारत गोरेगावकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मैदानावर जल्लोष साजरा केला. द्वितीय क्रमांक रहा संघ तृतीय क्रमांक अलिबाग तर चतुर्थ क्रमांक तीन संघाने पटकावला. या सामन्यातील मॅन ऑफ द सिरीजचा मानकरी रोहा संघातील ठरला. त्याला होम थिएटर देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज पेण संघाचा मंथन पाटील उत्कृष्ट गोलंदाज गोरेगाव संघाचा संघाचा आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक गोरेगाव संघाचा प्रणित पाटील यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. रायगड जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती संजय जांभळे व बाफना ज्वेलर्सचे विशाल बाफना यांच्या हस्ते विजयी संघास बक्षीस व पारितोषिक देण्यात आले. यावेळी क्रिकेट प्रमाणाचे कबड्डी स्पर्धेचे आयोजन हि पत्रकारांनी करावे यासाठी आम्ही नेहमी सहकार्य करण्यासाठी पत्रकार यांच्या सोबत असल्याचे माजी सभापती संजय जांभळे यांनी बोलताना सांगितले.तर कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांनी पेण पत्रकारांनी उत्तम असे क्रिकेट सामन्याचे आयोजन केल्याने कौतुक केले तसेच सर्वांनी एकत्र येऊन पुढे ही समाज हिताचे कार्य करायचे असल्याचे सांगितले तर विशाल बाफना व जिल्हा अध्यक्ष राजेश खराडे यांनी ही आपले विचार मांडले. सामन्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार पेण संघाच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष, पदाधिकारी यांनी मेहनत घेतली तर क्रिकेट सामन्याला जिल्ह्यातील पत्रकारांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला होता.

======================

# शाळेतील मंतरलेले दिवस आठविण्यासाठी पुन्हा एकदा वाजली काळाधोंडा शाळेची घंटा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**:आठवते मज माझी शाळा ...लाविते ती मजला लळा ...एक दिवस शाळेसाठी शाळेतील आठवणी जागविण्यासाठी अगदी खरं..."शाळा "या दोन अक्षरी शब्दात किती मोठे "विश्व" सामावले त्याची जाणीव आपल्याला शाळा सोडून काही वर्षे झाल्यावर होते. शाळेतले प्रेम मित्रांसोबत केलेली मस्ती मैदानावरचे खेळ, गुरूंजीचे बोलणे ,तास चालू असताना केलेली बडबड अगदी सगळ आठवतंय .गेलेले शाळेचे दिवस परत येत नाहीत.शाळा सोडल्यानंतरही शाळा , शाळेतील शिक्षक आणि शाळेच्या आठवणी या आयुष्यभर आपल्या आठवणीत राहतात. अशा या शाळेला पुन्हा भेटण्यासाठी रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळा धोंडा येथे आजीमाजी विद्यार्थी मेळावा पार पडला. फक्त विद्यार्थीच नाही तर माजी शिक्षकांचा हि सन्मान करण्यात आला .आजी-माजी विद्यार्थी व आजी-माजी शिक्षकांचा हा मेळावा भरवण्याची संकल्पना ज्या ग्रुपने मांडली ती संकल्पना वास्तवात उतरवण्याचे काम श्री प्रदीप म्हात्रे गुरुजी यांनी यशस्वीरित्या पार पाडली. माजी विद्यार्थिनी एकत्र येऊन भविष्यकाळातील ते मोरपंखी दिवसांच्याआनंदी आठवणीना उजाळा दिला. माजी विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रदीप म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याच्या आयोजन करण्यात आले या मेळाव्यात शाळेतील सर्व आजी-माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्याची सुरुवात कोटगावातून सुंदर रॅली काढून करण्यात आली. आलेल्या माजी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे स्वागतानंतर या स्नेह मेळाव्याची सुरुवात झाली. कोण कुठे? काय करतो ? अशा प्रश्नांची उत्तरे यावेळी मिळाली. तसेच एकमेकांच्या भेटीने गोड हितगुज झाले .मित्र-मैत्रिणी आणि आपले



जुने शिक्षक भेटल्याने माजी विद्यार्थ्यांच्या या भेटीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या सुंदर मेळाव्याचे यशस्वी नियोजन होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्राम शिक्षण समितीने मोलाचे सहकार्य केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रदीप म्हात्रे सर व सहकारी शिक्षक वृंद, विद्यार्थी यांचेही योगदान महत्त्वाचे आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश पंडित सर आणि नागाव शाळेच्या शिक्षिका मेहेत्रे मॅडम यांनी केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रदीप म्हात्रे सर यांनी सर्वांचे आभार मानले. भविष्यकाळ , वर्तमान काळ व पुढे भुतकाळाचीही सांगड घालून याही पुढे असा हा स्नेहमेळावा साजरा व्हावा अशी इच्छा सर्वांनी व्यक्त करून या स्नेहमेळावाची सांगता केली. पण पुन्हा भेटण्यासाठी...

# तुम हाथ पकड़ना मेरा जब मैं बूढ़ा हो जाऊं"

## महाकुंभात दोन पुत्रांचे अनोखे समर्पण

### प्रयागराज महाकुंभ – एका विलक्षण दृश्याची साक्षी

**"तुम हाथ पकड़ना मेरा जब मैं बूढ़ा हो जाऊं"** – ही ओळ प्रयागराज महाकुंभातील एका हृदयस्पर्शी प्रसंगात जिवंत झाली. महाकुंभाच्या विशाल जनसागरात एक दृश्य सर्वांचे लक्ष वेधून घेत होते–102 वर्षांचे वृद्ध वडील आणि त्यांचे दोन समर्पित पुत्र! या दोघा भावंडांनी आपल्या वृद्ध पित्याला प्रेमाने आधार देत स्वतःच्या हातांनी उचलून त्रिवेणी संगमात शाही स्नान घालून कुटुंबसंस्थेचे आणि सेवेचे श्रेष्ठ उदाहरण साऱ्या जगासमोर ठेवले.प्रयागराज ही गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमाने पवित्र झालेली भूमी आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला मोक्षाचा आनंद मिळावा, अशी भावना असते. हजारो वर्षांची परंपरा असलेल्या महाकुंभात प्रत्येकाच्या श्रद्धेची परीक्षा पाहिली जाते. मात्र, यंदाच्या कुंभमेळ्यात दोन पुत्रांच्या निस्वार्थ सेवाभावाने सर्वांचे हृदय जिंकले.धक्कादायक वास्तव असे आहे





की, आजच्या काळात अनेक वृद्ध आई-वडील दुर्लक्षित होतात, वृद्धाश्रमात आपले शेवटचे दिवस घालवतात. परंतु या दोन पुत्रांनी आपल्या वडिलांना आपल्या खांद्यावर उचलून त्रिवेणी संगमात स्नान घालून संपूर्ण समाजाला एक अतुलनीय संदेश दिला– "आई-वडिलांची सेवा हीच खरी भक्ती!"ही जोडी केवळ पिता-पुत्रांचे नाते दर्शवणारी नव्हती, तर त्याग, भक्ती आणि सेवा यांचे अद्वितीय उदाहरण होती. वृद्ध वडिलांना स्वतः उचलून स्नान घालण्याची जबाबदारी घेताना दोन्ही पुत्रांच्या डोळ्यांत प्रेम आणि कर्तव्यभाव स्पष्ट दिसत होता. आजच्या काळात वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती वाढत असताना, या दोघा भावंडांनी समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. महाकुंभातील शाही स्नान भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा पवित्र सोहळा आहे, ज्यात लाखो भक्त, साधू-संत सहभागी होतात. परंतु यावेळी, दोन समर्पित पुत्रांनी आपल्या 102 वर्षांच्या वडिलांना त्रिवेणी संगमात स्नान घालण्याचा प्रसंग सर्वांच्याच हृदयाला भिडला. हा क्षण उपस्थित भाविकांसाठी फक्त एक दृश्य नव्हते, तर मानवतेचा आणि निस्वार्थ सेवाभावाचा संदेश देणारे उदाहरण ठरले.हा प्रसंग प्रत्येकाला विचार करायला लावणारा आहे की, वृद्ध माता-पिता आपल्या जीवनाची अनमोल ठेव आहेत. त्यांचा सन्मान आणि काळजी घेणे ही केवळ जबाबदारी नाही, तर कर्तव्य आहे. महाकुंभातील या पिता-पुत्रांच्या घटनेने संपूर्ण समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे.प्रयागराज ही केवळ धार्मिक नगरी नाही, तर ती भारतीय संस्कृतीच्या मूल्यांची साक्ष देणारी भूमी आहे. इथे गंगा-जमनी संस्कृती नांदते, जी श्रद्धा, भक्ती आणि एकोपा यांचे दर्शन घडवते. या भूमीवर घडलेल्या या प्रेरणादायी घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले की, परंपरा आणि कुटुंबसंस्था ही आपल्या समाजाची खरी ताकद आहे. महाकुंभातील या प्रसंगाने प्रत्येकाला शिकवले की, वृद्धापकाळ हा कुणासाठीही टाळता येणारा नाही. आज आपण आपल्या वृद्ध आई-वडिलांची सेवा केली, तर उद्या आपल्या पुढच्या पिढीला याच संस्कारांची शिकवण मिळेल. या दोन पुत्रांनी दाखवलेले प्रेम आणि कृतज्ञता केवळ त्यांच्या कुटुंबापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**आसाराम विरकर, उपसंपादक,**
**दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

# बेजबाबदार कारखाना निरीक्षणालयाच्या दुर्लक्षामुळे अपघाताचे वाढते प्रमाण-मनसे रामदास पाटील

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** –रसायनी औद्योगिक वसाहतीतील पाताळगंगा येथील रिलायन्स कंपनी मध्ये अचानक आग लागल्याने मोठी दुर्घटना घडली असल्याचे समजते पण अद्याप तपास वर्गाकडून अधिकृत त्या आगी मागची कारणे समजावी म्हणून मनसे सौनिकांनी घटनास्थळी जाऊन पाठपुरावा केला . सदर अपघाता ठिकाणी आग नियंत्रणात आल्याची माहिती खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिली असून रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्या अग्नीशमन यंत्रणेला आग विझवण्यात झटपट यश मिळवल्याने आगीवर नियंत्रण ठेवण्यात यश आले. त्या बचाव कार्यात युद्धपातळीवर रसायनी पोलीस, सामजिक संस्थेचे कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचुन मदतकार्या ठिकाणी उपस्थित होते.यावेळी मनसे सैनिकांनी जिल्ह्यात होत असलेल्या औद्योगिक क्षेत्रातील अश्या सततच्या अपघातामुळे ,कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काही अत्यंत महत्व पूर्ण असलेल्या तांत्रिक मुद्द्यांवर प्रखरशाने प्रकाश टाकला .कामगारांची सुरक्षा,आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी औद्योगिक सुरक्षा ,आरोग्य संचालनालया कडे उत्पादन, साठवणूक आणि आयात नियम,अपघात आपत्कालीन नियोजनाची महत्वाची जबाबदारी दिली जाते परंतु यावर माजोर कँपनी व्यवस्थापन व अधिकारी वर्गाची हातमिळवणी झाल्याने सुरक्षा नियमांचे बारा वाजले आहे , वारंवार आग लागत असलेल्या कंपन्यांच्या बाबतीत मनसे च्या वतीने अनेक वेळा कंपन्यांच्या सुरक्षेच्या नियमांची चौकशी करण्याची मागणी केली होती. परंतु कारखाना निरीक्षणालयाच्या दुर्लक्षामुळे वारंवार अनेक कामगारांना जीव कमावा लागत असल्याने मनसेने संताप व्यक्त करत सध्याच्या अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करावी व IAS अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या सारखा कर्तव्यदक्ष अधिकारी नेमावा अशी मागणी केली .यावेळी पनवेल तालुकाध्यक्ष रामदास पाटील व दीपक कांबळी,संजय तन्ना या नेत्यांच्या शिष्टमंडळाने प्रसार माध्यमांच्या वतीने कामगारांना व अपघातग्रस्तांना कुठल्याही प्रकारची मदत लागल्यास मनसे कार्यालयात तक्रार द्यावी असे आव्हान ही केले.

### रिलायन्स कंपनी आग दुर्घटनेनंतर मनसे आक्रमक



# के वी कन्या शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे संमेलन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** –के वी कन्या शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे संमेलन नुकतेच पार पडले. त्या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.ज्या शाळेच्या शिक्षण संकुलात आपण लहानाचे मोठे झालो आणि आज त्याच शैक्षणिक संस्थेच्या चेअरमन पदावर कार्यरत असताना होणाऱ्या विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांना मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणे अभिमानास्पद वाटते. असे मत प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केले. त्यावेळी उपस्थित असलेल्या जेष्ठ शिक्षकांमध्ये आपल्या विषयाची आत्मीयता पाहून आपण योग्य मार्गावर आहोत आणि जबाबदारी मोठी आहे याचा प्रत्यय आला.यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्या सोबत शाळेच्या मुख्यध्यापिका सौ. कांचन वावेकर, सौ. स्नेहा पाटील , सौ. उज्वला पाटील, सौ. शिर्के मॅडम, श्री. नितीन पाटील, श्री. चव्हाण, सौ. आंधळे , सौ. खंडारे मॅडम, सौ. दिपाली गोसावी मॅडम, सौ.जाधव व सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पळशी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कोकिळा बडक यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ योगेश पालोदकर/ सिल्लोड:-** तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कोकिळा बडक यांची बुधवारी बिनविरोध निवड करण्यात आली.कोकिळा बडक यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. पळशी ग्रामपंचायतीचे सरपंच भाऊसाहेब विश्वनाथ बडक यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी बुधवारी ग्रामपंचायत पळशी कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी कोकिळा बडक यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी जयस्वाल यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी ग्रामपंचायत पळशीचे ग्रामसेवक, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पदी निवड जाहीर झाल्यानंतर गावकऱ्यांनी भव्य मिरवणूक काढत कोकिळा बडक यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच कोकिळा बडक यांनी दिली.



======================

# मातृतीर्थावरील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा सर्वात मोठा बहुमान-डॉ.गणेश गायकवाड

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा :वार्ताहर** : मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे, बहुजन साहित्य संघ, चिखली, जि. बुलढाणा च्या वतीने दि. ३१ मार्च, २०२५ रोजी आयोजित तसेच बहुचर्चित सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्विकारावे यास्तव, दि. ११ - ०२ - २०२५ रोजी संघाचे सचिव तथा सामाजिक सेवेसाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर तसेच भावकवी अंकुश पडघान यांच्या सह अध्यक्ष तथा आपल्या प्रदीर्घ समाजकार्यामुळे अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित डॉ. विजयकुमार कस्तुरे, अडव्होकेट, चिखली यांनी सबंध भारतभर सुप्रसिद्ध असलेल्या तथा उर्दू शायरीस वाहून घेतलेल्या आणि यशस्वी शल्यचिकित्सेसाठी ख्यातनाम असलेल्या बुलढाणा येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गणेश गायकवाड यांची भेट घेऊन, नुकत्याच अबूधाबी येथील गौरवास्पद कार्यक्रमात सन्मानित झाल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून उपरोक्त नियोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी स्विकारावे यास्तव सविस्तर चर्चा करून नम्र विनंती सुध्दा केली. आणि त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याकारणाने आज ब. सा. संघाचे अध्यक्ष, डॉ. विजयकुमार कस्तुरे, सचिव डॉ.डी. व्ही. खरात सर, उपाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक कवी तथा आपल्या समृध्द परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त कथाकार डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, सल्लागार तथा ग्रामीण साहित्य चळवळ, बुलढाणा चे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक कवी कडूबा बनसोड, नागनगाव, ता .देऊळगाव राजा, सल्लागार तसेच ज्येष्ठ साहित्यिक कवी व संपादक तथा सामाजिक सेवाभावी कार्यकर्ते प्रा.भास्कर इंगळे, बुलढाणा, सल्लागार व चळवळीतील सक्रिय धडाडीचे सेनानी एस्. बी. शिंदे आणि पदाधिकारी अंकुश पडघान असे ब. सा. संघाच्या नूतन कार्यकारिणीच्या सर्व मान्यवर पदाधिकारी मंडळींनी मिळून, ब. सा.सं. च्या वतीने उपरोक्त नियोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आल्याबद्दल चे सर्वांच्या सह्यांचे लेखी पत्र, डॉ. गणेश गायकवाड यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन प्रदान करून पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान व सत्कार केला तसेच हार्दिक अभिनंदन करण्यात आले. त्याप्रसंगी डॉ.गणेश गायकवाड यांनी वरील प्रमाणे उदगार काढले. त्यांच्या या निवडीबद्दल सबंध महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातील साहित्यिक, नागरिक तथा विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# मांदाड येथील अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन



**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी : नितीन लोखंडे/तळा :** तळा तालुक्यातील मौजे मांदाड येथील महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खा. सुनील तटकरे साहेब, महिला बालकल्याण मंत्री आदिती ताई तटकरे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या मांदाड चेक पोस्ट पासून मांदाड गावामध्ये जाणाऱ्या अंतर्गत डांबरीकरण रस्त्याचे भूमिपूजन ग्रुप ग्रामपंचायत मांदाड सरपंच सौ.लता करंजे, उपसरपंच अनंत लोखंडे. यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजनानंतर प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मांदाड अंतर्गत होत असलेल्या रस्त्यामुळे भूमिपूजना वेळी मांदाड येथील ग्रामस्थांनी तटकरे कुटुंबियांचे आभार मानले. या कार्यक्रमाप्रसंगी गितीशा ग. दांडेकर ग्रा. सदस्य, उमेश करंजे सचिव तळा ता. रा.काँ पार्टी, दिनेश पिठे आगरी समाज अध्यक्ष, सुरेश करंजे कुणबी समाज ग्रामस्थ अध्यक्ष, रशीद बानकोटकर मुस्लिम समाज कार्यकर्ते, अशोक करंजे कुणबी समाज मुंबई अध्यक्ष, लक्ष्मण गोपाल पिठे कोळी समाज कार्यकर्ते, विठ्ठल देवकर मा.पोलीस पाटील, संदेश चव्हाण पोलीस पाटील, कृष्णा मालुसरे जेष्ठ कार्यकर्ते, मोहन करंजे, सहदेव करंजे, विलास करंजे, विनोद करंजे, सुरेश करंजे, राजेश करंजे, रमेश करंजे, एकनाथ पिठे, काशिनाथ पिठे, आदी राष्ट्रवादी कार्यकर्ते पदाधिकारी, मांदाड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण मध्ये सात बांगलादेशी नागरिकांना अटक

## उरण पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**–उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गामी कंट्रक्श द्रोणागिरी नोड ननवीन शेवा गावाजवळील पुला जवळ काही घुसखोर बांगलादेशीय नागरिक वीना परवाना भारतामध्ये प्रवेश करून बनावट कागदपत्राच्या आधारे आपली स्वतःची खरी ओळख लपवूनआपण भारतीय असल्याचे भासवीत अनधिकृतपणे सदरच्या ठिकाणी वास्तव्य करीतअसल्याची माहिती.उरण पोलीसाना मिळताचसदरचे नागरिक हे बांगलादेशीयअसल्याची खातरजमा करून या व्यक्तींना उरण पोलिसांनी अटक केल्याने परिसरात खळबळ माजली आहे .पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिकृत माहितनुसार गेल्या काही दिवसापासून सदरचे बांगलादेशीय नागरिक वीना परवाना भारतामध्ये प्रवेश करून बनावट कागदपत्राच्या आधारे या ठिकाणी वास्तव्य करून राहत असल्याची माहिती उरण पोलिसांना मिळाली असता पोलिसांनी महितीची खात्री करून घेतली व त्या अनुषंगाने सदरची महिती सहा. पोलीस आयुक्त विशाल मेहुल आणि उरण पोलीस ठाण्याचे व.पो. नी.जितेंद्रमिसाळ यांना दिली वरिष्ठानी दिलेल्या आदेशानुसारगुन्हे प्रगटीकरणपथकाचे सं.पो.नी.नितीन खाडे.व त्याच्या सहकार्यांनी मिलेल्या माहीतिच्या अनुषंगाने सदर ठिकाणी जाऊन चौकशी करून त्या ठिकाणी सदरच्या 7 व्यक्तीया अनधिकृतपणे बनावट कागद पत्राच्या आधारे आपण भारतीय नागरिक असल्याचे भासवीत विनापरवाना घुसखोरी करून त्या ठिकणी वास्तव्य करीत असल्याचे निष्पन्न झालेआहे.त्यांच्या विरुद्ध पोशी/3950दीपक भोर्जेयांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरून 7 जणांवर गुन्हा दाखल केला आहे.अनुक्रमे1)अव्हिजीत बीष्णूपदा रॉय वय36,2)सुकुमार सधान बिस्वास वयवर्ष-51,पलाश बासुदेव तरफदार वय वर्ष40. 4)जहांगीर सत्तार हुसेन वय वर्ष27,5) अब्दुर रज्जाक मोक्तार लसकरवय वर्ष48.6)सुब्रोतो जयगोपाल पाल वयवर्ष32, 7) हन्नान अली नबीर अली खानवय वर्ष32हे सर्व जण अनधिकृतपणे गामी कंट्रक्शन द्रोणागिरीनवीन शेव ब्रिज च्या बाजूला राहत होते य त्याठिकाणी मजूर म्हणून कामकरीत होते हे सर्व मुळचे रहाणार, जिल्हा नडाईल,बांगलादेशया सर्वांकडे वेगवेळ्या क्रमांकाचे मोबाईल सापडले आहेत या सर्वांना उरण पोलिसांनी अटक केली आहे.या कामी गंभीर गुन्ह्याच्या अनुषंगाने परीमंडळ-2 चे पोलीस उपयुक्त प्रशांत मोहिते,पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल नेहुल,यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याचे व.पो.नी.जितेंद्र मिसाळ,शरद जाधव पोलीस निरीक्षक(प्रशासन)स.पो.नि. नितीन खाडे,पो.उ.नी संजय राठोडव गुन्हे प्रगटीकरण पथकांतील त्यांचे सर्व सहकारीयांनी अथक प्रयत्न करूनही कारवाई केली आहे.

# पत्नीच्या खात्यावर चुकीने जमा झालेले ३ लाख १२ हजार रुपये पतीने केले बँकेस परत



**दैनिक युवक आधार**

**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे**:सध्याच्या युगात थोडया थोडया पैशासाठी माणसा माणसात भांडणतंटे होऊन त्यातुन गंभीर घटना घडत असल्याची अनेक उदाहरणे आहेत.परंतु पिंपळवाडी (पि) येथील ईम्रान शेख व त्यांची पत्नी तनजीला शेख यांनी माणुसकी जपत नजर चुकीने आपल्या खात्यावर जमा झालेले तब्बल तीन लाख बारा हजार रुपये बँकेस परत केल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.याविषयी अधिक माहिती अशी की,पैठण तालुक्यातील पिंपळवाडी (पिराची) येथील इम्रान शेख यांची पत्नी पंधरा दिवसांपुर्वी चुकुन पत्नी तनजीला शेख यांच्या बंधनं बँक पैठण या शाखेतील खात्यावर पंधरा दिवसांपूर्वी समता पतसंस्था पैठण शाखेचे नजर चुकीने ३ लाख १२ हजार रूपये जमा झाले होते. हि बाब पती ईम्रान शेख यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या मनात कोणताही स्वार्थ व लालसा उत्पन्न होऊ न देता पत्नी तनजीला शेख यांच्या बंधन बँकेच्या बँक खात्यावर चुकुन आलेले तीन लाख बारा हजार रुपयांचा धनादेश समता पतसंस्थेचे अधिकारी एडके यांच्या हाती सुपुर्त करून माणुसकीचे दर्शन घडवले इम्रान शेख व त्यांच्या परीवाराने दाखवलेल्या इमानदारी मुळे पिंपळवाडी (पि) परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# जीवाची मुंबई"रसिकाश्रय चा स्तुत्य उपक्रम - मुख्यमंत्री

## घरेलु कामगारांना घडवून आणली विमान वारी !

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर** –महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या वारीचे स्वागत करत सह्याद्री अतिथी गृहावरती भेट देऊन सर्व महिलांची आपुलकीने विचारपूस करून समस्या जाणून घेतल्या. यावेळेस महिलांनी लाडकी बहीण बंद करू नका असा मुख्यमंत्र्यापुढे आग्रह धरला त्यास मुख्यमंत्र्यांनी दुजोरा देत सांगितले ही योजना बंद होणार नाही.यावेळी सामाजिक कार्यकर्ते महेश पवार यांनी घरेलू महिला कामगारांना दरवर्षी दहा हजार रुपये सन्मान निधी मिळावा ही मागणी रेटून धरली. यावरही सकारात्मक विचार करू असे मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले. आणि जीवाची मुंबई हा रसिकाश्रयचा स्तुत्य उपक्रम आहे हा सतत सुरू राहावा यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाला सामाजिक कार्यकर्ते महेश पवार राबवितात. सोबत सह संयोजक देवेंद्र गणवीर आणि प्रा. विलास तेलगोटे कृषी महाविद्यालय




नागपूर जबाबदारी सांभाळतात."जीवाची मुंबई" उपक्रमात सहयोगी संस्था आणि व्यक्ती रसिकाश्रय संस्था घाटंजी, सत्यसामाजिक संस्था देवरी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, मुंबई, क्षितिज फाऊंडेशन, डॉ. राजू गुल्हाने सहाय्यक कामगार आयुक्त, जळगाव, वर्षा विद्या विलास, अमोल मडामे, स्नेहल चौधरी, मानसी गवाणकर, उमेश भोयर, विजय शिवणकर, राहुल साळवे, हरिष खेडकर, अड. योगिता खेडकर यांनी अथक परिश्रम घेतले.

**स्वप्नातही विचार केला नाही त्या विमानात बसायला भेटलं**

घरात दोन मुलं आहे व एकाचे लग्न झाले. पती रोज मजुरी करतात. ६ घरी धुणी, भांडी करून प्रत्येक घरी ६०० रुपये महिन्याला कमवतात. सकाळी आठ वाजता पासून तर सात वाजेपर्यंत काम करावे लागते. घरची परिस्थिती हलाकीची आहे. त्यामुळे स्वतःच्या आनंदासाठी एकही रुपया खर्च करता येत नाही. आयुष्यात कधी विमान बघितलं नव्हतं परंतु महेश भाऊच्या माध्यमाने विमानात बसायला भेटलं आणि आकाशी झेप घेतली माझ्या जीवनाचं सार्थक झालं असं मला वाटते.

**शोभा अशोक वहिले, वय वर्षे ६०, घाटंजी**

**माझ्या जवळ बसले मुख्यमंत्री !**

पाच वर्षा आधी मुलगा मरण पावला, ५ वर्षाची नातं आहे, २० वर्षांपासून लोकांच्या घरी धुनी - भांडी करीत आहो, साधं नातलगच्या कुणाच्या घरी जाणं होत नाही, मुंबई तर स्वपणातच! महेश भाऊ नी मुंबई घडवली मुख्यमंत्री साहेबांना टीव्ही वरच पाह्यल होतं "मुख्यमंत्री माझ्या डोयापुढं बसून होते, मुख्यमंत्र्याला भेटणे हे माह्य भाग्य.. समजते " जिवाच्या मुंबईचे आभार.. महेश बापूचे आभार.

**सुमनबाई ढोके, वय ६५ वर्ष घाटंजी**

जीवाची मुंबई आनंद देणारी वारी..! माझ्या आईला विमानातून फिरवावं हे माझं स्वप्न होतं.. माझी आई गेली तिला विमानवारी मला घडविता आली नाही.....रात्रंदिवस काबाड कष्ट करून धुनी भांडी करणाऱ्या महिलांनी आयुष्यात आनंद घ्यायचाच नाही का.त्यांना आनंद देण्यासाठी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी जीवाचे मुंबई श्रमाचे आनंदवारी हा उपक्रम आम्ही सुरू केला. घरेलू कामगार महिलांना विमानात बसवल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचा जो आनंद मी बघत होतो हा माझ्यासाठी आनंदाश्रू आणणारा होता...त्यांच्या रूपात माझी आई मला दिसत होती. महेश पवार, मुख्य संयोजक जीवाची मुंबई

# ग्रुप ग्रामपंचायत विंधणे प्रीमियर लीग २०२५ च्या भव्य ऑक्शन सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : एम. एम. व्ही. क्रिकेट क्लब धाकटी जुई यांच्या आयोजनाखाली आज छाया रिसॉर्ट मानघर येथे "ग्रुप ग्रामपंचायत विंधणे प्रीमियर लीग २०२५" च्या भव्य ऑक्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थिती दर्शवली. मा. सरपंच श्री.शक्ती बाळकृष्ण म्हात्रे आणि मा. उपसरपंच श्री. मंगेश मधुकर घरत यांच्या पुढाकाराने सदर सोहळ्याचे नियोजन उत्तम रित्या करण्यात आले होते. या लीगमध्ये एकूण 8 गावातील 16 संघ खेळवली जातील. क्रिकेट क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूला जास्तीत जास्त मानधन मिळून त्याच्या कलेला भविष्यात प्रोत्साहन मिळण्यासाठी अशा प्रकारे त्यांनी आयोजन केले त्याबद्दल त्यांचे शेकापनेते प्रीतम म्हात्रे यांनी अभिनंदन केले.यावेळी यावेळी शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांच्यासोबत श्री. रोशन डाकी (सरपंच), श्री. दर्शन म्हात्रे, श्री. संग्राम घरत, श्री. प्रल्हाद पाटील, श्री. सज्जन नवाळे, श्री. नामदेव केनी, श्री. वसंत नवाळे, श्री. आकाश पाटील, श्री. विशाल पाटील, श्री. संजय ठाकूर व इतर मान्यवर आणि खेळाडू उपस्थित होते.



# पनवेल शहर पोलिसांतर्फे इंडियन कोस्ट गार्डचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन कायदा सायबर फ्रॉड व नवी मुंबई व्हॉटसअप चॅनेल बाबत करण्यात आले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर**:नवीन कायदा व सायबर जनजागृती कार्यक्रमांतर्गत पनवेल शहर पोलिसांतर्फे इंडियन कोस्ट गार्डचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन कायदा सायबर फ्रॉड व नवी मुंबई व्हॉटसअप चॅनेल बाबत मार्गदर्शन करण्यात आले.वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड.सचिन पटेल यांनी उपस्थितांना नवीन कायद्याविषयक मार्गदर्शन केले. तर पो.नि.शाकीर पटेल यांनी पोलीस जनता समन्वयक मार्गदर्शन केले. तसेच सायबर गुन्हे मार्गदर्शन व व्हॉटसअप चॅनेल याचे मार्गदर्शन पो.उपनिरीक्षक अभय कदम यांनी केले. तसेच यावेळी उपस्थित केलेल्या शंकांचे निरासन सुद्धा केले.

# सुरकुंडी येथे नवनिर्वाचित आमदार बाबाजी शेठ काळे यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**

**डॉ. देवेंद्र ओहाळ खेड/पुणे सुरकुंडी**–सुरकुंडी येथे सुरकुंडी गावातील ग्रामदैवत कुलस्वामिनी श्री महालक्ष्मी मंदिर येथे आज नवनिर्वाचित आमदार श्री. बाबाजीशेठ रामचंद्र काळे यांनीभेट दिली त्यावेळीसुरकुंडी गावचे विद्यमान उप - सरपंच श्री.प्रदिप तायाराम पऱ्हाड व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कारकरण्यात आला. त्यावेळी सुरकुंडी मधील ग्रामस्थांनी आपल्या विविधमागण्यांचे निवेदन व समस्या त्यांना सांगण्यात आल्या. यावेळी सुरकुंडी गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते,मा.श्री.सरपंच राजाराम पऱ्हाड, शिक्षक मा.श्री.शरद वाजे सर, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ.देवेंद्र ओव्हाळ, मा.सरपंच शशिकांत वाजे, मुख्याध्यापक कोंडिभाऊ डामसे गुरुजी,सदस्य ज्ञानेश्वर पऱ्हाड, शिवसेना शाखाप्रमुख अनिल कौदरे, राजाराम धंद्रे, अशोक जाधव,किसन



मेमाणे, चंद्रकांत डामसे,विजय दुधावडे, सचिन शिर्के, अंकुश शिर्के, कोंडीबा ओव्हाळ,नावानंतर चंद्रकांत वाजे उगले साहेब सिताराम वाजे मोतीराम वाजे साहेब सखाराम वाजे ही नावे टाकली व बातमी संपूर्ण जॉईन करणेयांच्यासह आदि ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तेव्हा नवनिर्वाचित आमदार श्री. बाबाजीशेठ रामचंद्र काळे यांनी ही सर्वांच्या विनंति ला मान देऊन भविष्यात महालक्ष्मी मंदिरासाठी फुल नाही फुलाची पाकळी म्हणून महालक्ष्मी मंदिरासाठी ओट्याचे काम काळे परिवाराकडून होईल असा शब्द देण्यात आला व पुढे गावच्या विकासासाठी आमदार फंडातून विविध काम करण्यासाठी कटिबद्ध राहील असा शब्द देण्यात आला.तसेच सुरकुंडी गावातील सर्व मतदारांचे त्यांनी आभार व्यक्त केले, वरच्या पट्यातून जे लीड तुमच्या सारख्या लोकांकडून व प्रत्येक गावातून जो खारीचा वाटा उचलण्यात आला त्याबद्दल त्यांनी सर्व मतदारांचे ऋण व्यक्त केले.

# वाळू माफियांची मुजोरी, सिल्लोड तहसीलच्या महसूल पथकावर केली जोरदार दगडफेक

**दैनिक युवक आधार:-**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:- छत्रपती संभाजी नगरचे तहसीलदार रमेश मुंडलोड यांच्यासोबत वाळूमाफियांनी** केलेल्या कृत्याचा परिणाम जिल्हाभर पाहावयास मिळत आहे. महसूल प्रशासनाने वाळू माफियाविरुद्ध फास आवळला आहे. त्यावरून वाळू माफिया सुद्धा आक्रमक झालेले दिसत आहे. सिल्लोड मध्ये महसूलच्या पथकाने वाळूचे दोन ट्रॅक्टर पकडल्यानंतर या पथकावरच जोरदार हल्ला चढवला. तुफान दगडफेक करत शासकीय वाहनही पेटवून देण्याचा प्रयत्न केला. पथकातील कर्मचाऱ्यांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन पळावे लागले. हा थरार सिल्लोड तालुक्यातील दीडगाव- उपळी रस्त्यावर बुधवारी (१२ फेब्रुवारी) रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास घडला. दोन्ही ट्रॅक्टर पळवून नेले. याप्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी दि.(१३ फेब्रुवारी) पहाटे दोन वाजेच्या सुमारास ४ वाळू माफिया विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. तहसीलदार संजय भोसले यांनी मंडळ अधिकारी शंकर जैस्वाल यांना अवैध वाळू वाहतूक रोखण्याचे आदेश दिले आहेत, जैस्वाल यांनी सहा तलाठी , तहसीलदार यांचे सुरक्षा रक्षक व वाहन चालक असे नऊ जण सोबत घेऊन रात्रीची गस्त घालायला सुरुवात केली. दिडगाव- उपळी रस्त्यावर पथकाला दोन विना क्रमांकाचे ट्रॅक्टर वाळू वाहतूक करताना दिसले ते पथकाने पकडले. ट्रॅक्टर पकडल्याचे कळतात वाळू माफिया दादाराव दुधे आपल्या साथीदारांसह तिथे आला. त्याने पथकाला दमदाटी सुरू केली. मात्र पथक ऐकत नसल्याचे पाहून त्याने व त्याच्या साथीदारांनी जोरदार दगडफेक सुरू केली. त्यातील एकाने शासकीय वाहन पेटवण्याचा प्रयत्न केला. दगडाच्या तुफान माऱ्यामुळे पथकाने अक्षरशः तिथून पळ काढला. त्यानंतर दोन्ही ट्रॅक्टर घेऊन दादाराव दुधे तिथून पसार झाला. पथकातील अधिकारी सुरक्षित स्थळी आल्यावर त्यांनी पोलीस आणि तहसीलदारांना कॉल करून घडलेला प्रकार सांगितला.त्यानंतर सिल्लोड चे तहसीलदार संजय भोसले, पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांनी फौजफाटा घेऊन रात्री १० ते पहाटे १ पर्यंत पूर्णा आणि अंजना नदीचा पूर्ण परिसर पिंजून काढला. मात्र माफिया दादाराव दुधे व त्याचे साथीदार हाती लागले नाहीत. भराडी येथील मंडळ अधिकारी शंकर मोहनलाल जैस्वाल यांच्या तक्रारीवरून सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी वाळू माफिया दादाराव मिठ्ठू दुधे, याच्यासह ट्रॅक्टर चालक विलास सखाराम पांढरे, बंडू पुंडलिक फोलाने , विजय संजय शेजुळ ( सर्व रा.उपळी ता.सिल्लोड) आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




# बहुजन जनता दलाचे अध्यक्ष मा पंडितभाऊ दाभाडे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज गौरव भूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पुणे वार्ताहर**-पुणे येथील बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि सामाजिक सक्रिय कार्यकर्ते मा श्री पंडित भाऊ दाभाडे हे सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय धार्मिक कार्याच्या क्षेत्रात उत्तुंग आणि समाजभिमुख कार्य करीत आहेत आपण इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करायचे आपला नेहमी मानस आपल्या नजरेत असतो परंतु आपण त्याला प्रत्यक्षपणे स्वरूप देऊन जिद्दीने आणि स्वबळावर तर यशोशिखर गाठले आणि आपल्या कार्याचा व कर्तुत्वाचा ठसा महाराष्ट्रभर उमटविला त्यामुळे आपण महाराष्ट्र राज्यात परिस्थिती असून आपली वेगळी महत्वकांक्षा निर्माण झाली आहे आपल्या कार्यक्षेत्रातील सामाजिक योगदान फार अतुलनीय आणि अनुकरणीय आहे आपल्या अमूल्य जनसेवा कार्यामधून व्यक्त होणारे नवनिर्मितीचे ध्येय व कर्तव्य आपल्या असाधारण प्रतिभेचा प्रत्यक्षपणे राज्यातील सर्व जाती धर्मांच्या नागरिकांना व समाज घटकांना यांना फायदा होत असून म्हणून आपल्या रचनात्मक आणि आपले विधायक कार्य बहुजन जनता दलाच्या माध्यमातून धरणे आंदोलन रास्ता रोको आंदोलन मोर्चे उपोषण आमरण उपोषण लडकी बचाव लडकी पढाव अंधश्रद्धा निर्मूलन न वृक्षरोपण रक्तदान भोजनदान वस्त्रदान गोरगरिबांना आर्थिक मदत रुग्णांना आर्थिक साहित्य मदत अशा अनेक समाज उपयोगी आणि महामानव आणि महापुरुष यांच्या जयंती आणि पुण्यतिथी कार्यक्रम राबवून या महामानव आणि महापुरुष यांचे विचार राज्याच्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य बहुजन जनता दलाच्या प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून करीत आहात म्हणून आपल्या कार्याचा गौरव म्हणून भारतीय घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वपत्नी दलित बहुजन वंचित उपेक्षांच्या आणि इतरही समाज घटकांच्या माऊली त्यागमूर्ती मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून भारत सरकार प्रणित रजिस्टर नंबर एम एच २०२४/०४६७०३० आणि महाराष्ट्र राज्य मुंबई रजिस्टर क्रमांक ३१३३/२०१० जी बि बि डी. डॉ बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर कांबळे यांनी मा श्री पंडितभाऊ दाभाडे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन जनता दल यांच्या कार्याची दखल घेऊन मा विजय पाटकर साहेब अभिनेते निर्माता दिर्त्यक्षक मा उत्तमराव तरकसे साहेब क्राईम ब्रँच अधिकारी नवी मुंबई एडवोकेट अजय तापकीर साहेब प्रहार जनशक्ती पक्ष महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख सौ रंजीता पाटील मॅडम मराठी अभिनेत्री नाट्य कलाकार मा दिगंबर कोळी मराठी अभिनेता नाट्य कलाकार राकेश मोहिते, राष्ट्रीय बहुजन अधिकार संघटना आशिष सातपुते झी हास्य सम्राट अनिताताई पाटोळे घे ऊंच भरारी राजू मानकर मार्गदर्शक या सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती बहुजन जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे यांचा मुंबई घाटकोपर मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर येथील शहीद हॉल येथे महाराष्ट्र समाज भूषण गौरव पुरस्काराने सन्मानित करून ट्रॉफी प्रमाणपत्र मेडल शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन अध्यक्ष सुधीर कांबळे सौ सुरेखा जगधने राज्य उपाध्यक्ष सौ संगीता अडसूळ राज्य उपाध्यक्ष मा प्रियंका राज्य कोषाध्यक्ष मा पूनम सरदार महाराष्ट्र प्रसिद्धीप्रमुख मा सोनल थोरात मुंबई कोषाध्यक्ष सुशांत कदम मुंबई अध्यक्ष मधुकर निर्भवणे मुंबई उपाध्यक्ष चेतन कदम मुंबई उपाध्यक्ष अशोक मानकर मुंबई उपाध्यक्ष शितल जाधव पुणे जिल्हा अध्यक्ष रोहिणी पराडकर कोल्हापूर जिल्हाध्यक्ष आदींनी केले असून पुरस्कार वितरण सोहळा सूत्रसंचालन सोनाली सुतार आणि सागर वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुधीर कांबळे यांनी केले मा श्री पंडितभाऊ दाभाडे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन जनता दल यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याने मुंबई घाटकोपर मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर येथील शहीद हॉल येथे विजय भोसले बहुजन जनता दल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अश्विन गुरव बहुजन जनता दल मुंबई शहर अध्यक्ष राज कांबळे मंगेश कर्णिक राजेंद्र महल्ले संभाजी कदम पांडुरंग सदाशिव सोनु पाटील संजय क्षीरसागर अब्दुल कलाम आझाद शेखर गायकवाड यांच्यासह राज्यातील बहुजन जनता दलाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी तर पुरस्कार विजेते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते असे अश्विन गुरव बहुजन जनता दल मुंबई शहर अध्यक्ष यांनी कळविले आहे




बहुजन जनता दलाचे अध्यक्ष मा श्री पंडितभाऊ दाभाडे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना

# महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा

## वासवी भवन, सिडको रोड, नांदेड. जीवन गौरव पुरस्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**–नांदेड महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने या संस्थेचे आधारस्तंभ तथा मार्गदर्शक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा माननीय आमदार श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना वासवी भवन, सिडको रोड, नांदेड येथे जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच मा.आ.श्री.समीरभाऊ कुणावार यांना उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राजसभा खासदार माननीय अशोकरावजी चव्हाण साहेब हे होते अशोकराव चव्हाण साहेबांनी सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या बद्दल भरपूर स्तुती सुमने उधळली.सुधीर भाऊ अर्थमंत्री झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था खूपच उंचावर नेली होती. असे गौरव उदगार अशोक रावजी साहेबांनी काढले. वरील कार्यक्रमास आर्य वैश्य महासभा राज्य उपाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार व राम सावकार पत्तेवार कार्यकारनी सदस्य, उत्तम अण्णा चौधरी राज्य कार्यकारिणी बांधकाम समिती सहसचिव हजर होते माननीय सुधीर भाऊ मुनगंटीवार यांना जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला आहे



# निफाड तालुक्यातील करंजगाव येथे माघी पौर्णिमेला श्रीखंडेराव महाराजांच्या बारा गाड्या ओढतो अश्व...यात्रोत्सव मोठ्या उत्साहाने संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**:निफाड तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेले करंजगाव येथील श्री खंडेराव महाराज मंदीर हे मंदीर पौराणिक असून चांदोरी येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी खंडेराव महाराज म्हाळसामाता, बानाईमाता दुपारच्या भोजनासाठी गोदावरी नदीच्या तीरावर थांबले, भोजन करून विश्रांती घेतली. ते हेच जागृत देवस्थान असून भक्ताच्या मनोकामना पुर्ण होतात.अशी आख्यायिका आहे. करंजगावी प्रत्यक्ष प्रभू श्रीरामाच्या व लक्ष्मण यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भुमी आहे.प्रभु श्रीरामानी स्वत :च्या हस्ते स्थापन केलेले.... सिद्धेश्वर महादेव मंदीर आहे. दक्षिण मुखी हनुमान मंदिर आहे. सर्व प्राचीन मंदिरे गोदावरी नदीच्या तीरावर एका रेषेत आहे. गावात मध्यवस्तीत खंडेराव महाराज मंदीर असून दरवर्षी माघ पौर्णिमेला म्हणजे च दांडी पौर्णिमेलाबारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होतो. सालाबादप्रमाणे ह्या वर्षीयात्रा उत्सव ४ फेब्रवारी.२०२५ खंडेराव महाराज सेवेकरी यांच्या हस्ते घटस्थापना होऊन सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . प्रभू श्रीरामचंद्रांच्या व राजमाता अहिल्याबाई होळकर ,छत्रपती शिवाजी महाराज संत श्रेष्ठ जनार्दन स्वामी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या श्री क्षेत्र करंजगाव ह्या पावन भूमीत 12 फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता गोदावरी नदीच्या तीरावरीलश्री खंडेराव महाराज मंदिरात होम हवन मांडव डहाळे यांची वाजत गाजत मिरवणूक निघाली. संपूर्ण गावात महिला व मुलींनी सडा रांगोळी काढली.संध्याकाळी गोदाकाठी असलेल्या खंडेराव महाराज मंदीरात माजी सरपंच खंडू पाटील बोडके यांनी व मा. सरपंच मनिषा प्रवीण पाटील राजोळे यांनी संपत्नीक खंडेराव महाराजाची आरती केली. खंडेराव महाराजांचे वाहन असलेला अश्व गोदावरी नदीच्या पात्रात अंघोळीसाठी वाघे मंडळी च्या देवाची गाणी म्हणत वाजतगाजत मिरवणुकीने आणले. अंघोळी नंतर खंडेराव महाराज मंदीरासमोर अश्वाला हळद लावली . अश्वास बाशिंग बांधून सजवल्यानंतर अश्वाची संपूर्ण गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बारा गाड्या ओढण्याच्या मार्गावर ठिकठिकाणी कापूर अगरबत्ती लावली... भंडा-याची उधळण करीत... येळकोट येळकोट जय मल्हार..... सदानंदाचा येळकोट ...... खंडेराव महाराज की जय... च्या जयघोषातमिरवणूकीनंतर अश्व रथाला जोडून बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम पार पडला. बारा गाड्या अश्व ओढून जाताच... रस्त्यावर पेटवलेल्या कापूर ज्योती भंडारा कंपाळी लावण्यासाठी भाविकांची एकच झुंबड उडाली... त्यानंतर मंदिरात भाविकांची खंडेराव महाराज मंदीरात दर्शनासाठी अलोट गर्दी उसळली. महाआरती होवून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुनिल कराटे, जगन बाबा गांगुर्डे, रोहीदास हांडे, किरण पिठे, तुषार गोसावी, मल्हारी पावशे, सह शिवमल्हार मित्र मंडळ व खंडेराव महाराज भक्त मंडळ, पंचक्रोशीतील सर्व जय मल्हार वाघे मंडळ करंजगाव व पंचक्रोशीतील हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.



# तहसीलदारांची शाळेला भेट'हसत -खेळत अनुभवला पोषण आहाराचा स्वाद!

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी**
विशाल नाईकवाडे हे गुरुवार दि १३ फेब्रुवारी रोजी निफाडच्या शेवटच्या गावातील अचानक शाळेच्या आवारात पोहोचले तेव्हा विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत आश्चर्य दिसले.सरकारी अधिकाऱ्यांना सहसा फाईलींमध्ये आणि मिटिंगमध्ये पाहण्याचीच सवय असते.पण एखादा वरिष्ठ अधिकारी थेट आपल्या शाळेत आला,तोही गप्पा मारत,हसत-खेळत,यामुळे मुलांचे कुतूहल वाढले.शाळेची पाहणी करताना त्यांनी विद्यार्थ्यांशी त्यांची शैक्षणिक स्वप्ने, अडचणी आणि आवड याबद्दल संवाद साधला. कोणाला डॉक्टर व्हायचं आहे,कोणाला पोलीस,तर कोणाला शिक्षक,मुलांच्या या उत्स्फूर्त संवादाने तहसीलदारही भारावून गेले.शिक्षकांनी शाळेच्या गरजा सांगितल्या आणि विद्यार्थ्यांची परिस्थिती उलगडून दाखवली.

**मुलांसोबत थाळीतील स्वाद आणि आत्मीयतेचा स्पर्श.**-खरी गोष्ट घडली तेव्हा तहसीलदारांनी विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजन करण्याचा निर्णय घेतला.सरकारी पोषण आहार कसा असतो?त्याची गुणवत्ता काय आहे? आणि मुलांना तो कितपत आवडतो?हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी त्यांनी स्वतः जेवण घेतले.जेव्हा तहसीलदार मुलांसोबत ताट घेऊन बसले,तेव्हा काही मुलांच्या डोळ्यांत चमक दिसली,काहींनी लाजत-लाजत खाणं सुरू केलं,तर काहींनी मजेत गप्पा मारत पोषण आहारावरच संवाद साधला. "खिचडीभात चांगला शिजला आहे का?", असे प्रश्न विचारत




**विद्यार्थी समवेत पोषण आहाराचा आस्वाद घेताना तहसीलदार विशाल नाईकवाडे,गटविकास अधिकारी तुकाराम जाधव व विद्यार्थी**

नाईकवाडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यावर एका चिमुकल्याने "आज पोषण आहार स्पेशल आहे,कारण साहेब आमच्यासोबत आहेत!" असे म्हणून सर्वांना हसवले.

**शिक्षण आणि आरोग्य यांचा सुसंवाद**-या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना रोज शाळेत येण्याची आणि अभ्यासावर भर देण्याची प्रेरणा दिली. शिक्षणासोबतच शारीरिक पोषण हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी पटवून दिले. ग्रामीण भागातील मुलांनी केवळ पुस्तकी शिक्षण न घेता, स्वतःच्या आरोग्यावरही लक्ष द्यावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

**मुलांच्या स्मरणात राहणारा दिवस**-ही केवळ एका अधिकाऱ्याची शाळा भेट नव्हती, तर ती त्या विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय आठवण होती.यानंतर काही मुलांनी असेही सांगितले की, "आम्ही तहसीलदार साहेबांसारखे मोठे व्हायचे आहे!" त्यांच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा संचारली असून, शिक्षणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ झाला आहे.तहसीलदारांनी आपल्या सहजसंवादी आणि आत्मीय भूमिकेने प्रशासन आणि विद्यार्थ्यांमधील अंतर मिटवत, एका नवीन युगाची नांदी केली. ते केवळ अधिकारी नव्हते, तर त्या दिवशी ते त्या शाळेच्या एक बापासारखे मार्गदर्शक झाले होते!प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा ठरलेले तहसीलदार... या भेटीमुळे प्रशासन हा केवळ आदेश देणारा घटक नसून, तो लोकांच्या जिव्हाळ्याचा भाग असतो,याची प्रचिती आली.या प्रसंगी तहसिलदार विशाल नाईकवाडे,तुकाराम जाधव (गट विकास अधिकारी),प्रशांत बोरसे (विस्ताराधिकारी),विनायक नाथे,मुख्याध्यापिका आशा उगले संतोषी नांदूरकर युवा प्रशिक्षनार्थी सोनाली दराडे आदी उपस्थित होते.प्रतिक्रिया-तहसीलदारांनी शाळेला दिलेली भेट केवळ तपासणी नव्हती, तर ती एका कुटुंबप्रमुखासारखी होती. त्यांच्या या आत्मीयतेमुळे विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने शिकतील

आशा उगले
मुख्याध्यापिका
जि प्र शाळा डोंगरवाडी

# रेवदंडा आगरकोट किल्ल्यात बेकायदेशीर रात्री दिवसा बांधकाम ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाला केराची टोपली ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा** : महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यामधील रेवदंडा आगरकोट किल्लात केंद्र सरकार व राज्य सरकारची पुरातत्व वास्तूमध्ये बांधकामना परवानगी नसताना नियमबाह्य बांधकामे जोरदार होत आहेत. दिवसा रात्री जास्त मजूर मागून हिरव्या नेट जाळ्या झाकून बांधकाम जोरदार चालू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाला तर केराची टोपली दाखवली आहे . महाराष्ट्र सरकार यांच्या हातामध्ये आहे अशा रुबाबत बेकायदेशीर काम बिंदास चालू आहेत. विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रेम करणारे लोकच अनधिकृत, बेकायदा केंद्र सरकार, राज्य सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित पवार, रायगड जिल्हाधिकारी , पुरातत्व खात केंद्र व राज्य सरकार यांना न घाबरता न जुमानता बिंदास पणे अनधिकृत अनधिकृत बांधकाम करत आहेत अशी ग्रामस्थ, शिवप्रेमी, पर्यटकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे.तसेच भिंती व किल्ल्याचे कथडे बिन्धास्त पणे हम करोसे कायदा आपल्या हुकूमशाही, दादागिरीत आगरकोट किल्ल्यात तोडली आहेत.(दादागिरीचा बीड पॅटर्न राबवण्यात येत आहे) अशी जनतेमध्ये जोरदार संतप्त चर्चा चालु आहे.स्थानिकांच्या जमिनी खरेदी करून काही स्थानिक आणि धनदांडगे रेवदंडा आगरकोट किल्ल्यात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण क्षेत्रात प्रतिबंध आणि निर्बंधीत क्षेत्राचे उल्लघंन करून नियमबाह्य नवीन बांधकामे करीत असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास

**पुरातत्व खात्याशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ दखल घेऊन सांगितले रेवदंडा आगरकोट किल्ल्यात सर्व होत असलेली बांधकाम बेकायदेशीर आहेत त्यांना नोटीस बजावण्यात आल्यात केस केल्यात, त्या संबंधित जे डिपार्टमेंट आहेत त्यांना पण नोटीसा पाठवले आहेत जिल्हाधिकारी रायगड, त्यांना पण नोटीस पाठवले आहेत , लवकरच बांधकाम व्यावसायिक, बांधकामावर सरकारी कारवाई होणार आहे त्यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत राज्य सरकारच्या सर्व यंत्रणांना कळवण्यात आले आहे.**
**– बजरंग येलीकर,**
**संवर्धक सहाय्यक, भारतीय पुरातत्त्व विभाग**



आले आहे. या प्रकारामुळे अवाक् झालेल्या काही स्थानिक रहिवाशांनी रेवदंडा आगरकोट या ऐतिहासिक अवशेष आणि वास्तूची तोडफोड होत असल्याचा आरोप करीत केंद्रीय पुरातत्व विभागाकडे याबाबतची माहिती दिली. मात्र अशा तक्रार अर्जाची या विभागाकडून दखल न घेता जोणतीच कारवाईही केली नसल्याचे स्थानिक रहिवाशांचे म्हणणे असून एकूणच या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त होत असल्याचे दसून येते.भारतीय पुरातन सर्वेक्षणच्या नियम ३२ अन्वये प्राचीन स्मारके, पुरातत्वीय स्थळे, आणि अवशेष अधिनियम १९५९ अन्वये संरक्षीत स्मारकांच्या सीमेपासून १०० मीटर पर्यंत आणि त्यापलिकडे २०० मीटर पर्यंतच्या जागा खणणे आणि बांधकाम करण्यासाठी प्रतिबंध आणि निर्बधीत क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आले आहे. तसे फलक रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात केंद्रीय पुरातत्व विभागाच्यावतीने लावण्यात आले आहेत. मात्र तरीही प्रतिबंध आणि निर्बंधीत क्षेत्राचे उल्लघंन करून नियमबाहय बांधकामे केली गेली आहेत तसेच काही बांधकामे सुरू असल्याचे तक्रारी अर्जात म्हटले आहे. मात्र तरीही तक्रारीकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने ग्रामस्थ आणि इतिहासप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.रेवदंडा पोलीस पाटलांच घर किल्ल्यामध्ये एका हाकेच्या अंतरावर आहे ? ग्रामस्थांसह इतिहास प्रेमींमध्ये नाराजी रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरातील बांधकामे केंद्रीय पुरातत्व विभागाच्या आदेश फलकानुसार नियमबाहय होत असल्याचे निर्दशनास येते, मात्र ग्रामस्थांनी केलेल्या तक्रार अर्जानंतरही केंद्रीय व राज्य पुरातत्व विभाग दखल का घेत नाही? तसेच यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय पुरातत्व सचिव यांनी लक्ष घालुन अगरकोट किल्ल्याची भिंत पडून (किंवा) पाडून किल्ला जमीन दोस्त होण्यापासून वाचवावेअसा प्रश्न स्थानिक रहिवासी , शिवप्रेमी, पर्यटक करीत आहेत.

=====================

## सिध्देश्वर विद्यालय आष्टी ची माजी विद्यार्थीनी कु शितल अशोक राख हीची मुंबई शहर पोलीस पदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी मुकुंद हिवाळे**
**आष्टी ता . परतूर**-सिध्देश्वर विद्यालय आष्टी ची माजी विद्यार्थीनी कु शितल अशोक राख हिची नुकतीच मुंबई शहर पोलीस पदी निवड झाली. त्या अनुषंगाने कु. शितल राख या विद्यार्थीनी चा कौतुक सोहळा व सत्कार समारंभ विद्यालयाच्या वतिने आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बळीराम जी कडपे साहेब तसेच संस्थेचे संचालक विजयभैया कडपे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेभाऊ आघाव, अशोकराव राख, गजुभैया गंगणे ,राहुल कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी आदरणीय बळीरामजी कडपे साहेबांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आर्थिक संकटावर मात करून मुलांनी जिद्दीने अभ्यासाच्या जोरावर कशाप्रकारे यश संपादन करावे या विषयी मुलांना संबोधीत केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर, श्री जाधव सर, श्री साखरे सर, श्री हिवाळे सर, श्री पोटे सर तसेच श्रीमती शेटे मॅडम, चौरे मॅडम, व निलेवाड मॅडम यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री हिवाळे सर यांनी केले.



## सेडर चर्च 2025 क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न,
### इग्नाइट चर्च संघाने प्रथम क्रमांक पटकावला

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर** :सेडर चर्च आयोजित अंतर चर्चेस भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दिनांक 12 व 13 2025 रोजी हांडेवाडी येथील सनी इलेव्हन स्पोर्ट्स ग्राउंड येथे भरवण्यात आले होते, या क्रिकेट स्पर्धेमध्ये पुणे, मुंबई, दौंड, कुरूडवाडी, येथून 12 संघांनी यामध्ये सहभाग घेतला होता, दोन दिवस झालेल्या क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण काल संपन्न झाले होते, या क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक इग्नायट चर्च या संघाने पटकावला, द्वितीय क्रमांक आर्क बिल्डर्स यांनी पटकावला, (मॅन ऑफ द मॅच पांडू इग्नाइट चर्च यांनी पटकावला,) उत्कृष्ट फलंदाज अभिजीत मकासरे, मॅन ऑफ द सिरीज आशिष अंतू संघाने पटकावला, शिस्तबद्ध विशेष चषक आगापे चर्च या देण्यात आले होते, सदर बक्षीस वितरण शिवसेना शिंदे गटाचे पुणे शहर प्रमुख प्रमोद(नाना) भानगिरे यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना 2025 सेडर विजय चषक व स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक देऊन त्यांना गौरवण्यात आला, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पीटर परमार अध्यक्ष महिला क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र राज्य,अनिल गडकरी सर शिवसेना शिंदे गट शिक्षक शिक्षकेतर पुणे जिल्हा प्रमुख, पास्टर मिलिंद मोरे, शितल कुमार थोरात, निलेश जगताप शिवसेना शिंदे गट कसबा विधानसभा प्रमुख, उद्योजक स्वराज बाबर, संदेश बोर्डे आदि यावेळी उपस्थित होते, या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सुनील जाधव, सॅम्युअल नाईकनवरे, रवींद्र व्हासेमनी, आशिष मोरे आदींनी केले.




## उरण परिसरात बांगलादेशींच्या घुसखोरी मुळे उरणच्या नागरिकांची सुरक्षितता ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी**:रत-बांगलादेशामध्ये असलेली मैदानी सीमा तब्बल ४०९६ किलोमीटर आहे २८०० पेक्षा जास्त किलोमीटर सीमेवर भारताने काटेरी तारांचे कुंपण लावले आहे तरीही बांगलादेशातून पाच ते सहा कोटी लोकांनी भारतात घुसखोरी केली आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली आहे. आपल्या देशातील विचित्र कायदे हे घुसखोरीला उत्तेजन देत आहेत. त्याला कायद्याने फार कमी शिक्षा आहे तर कधी ते जामीनावर ही सुटतात त्यामुळे अशा घुसखोरीचे प्रमाण वाढले आहे. उरण सह सिडकोचे नवीन शहर म्हणजे द्रोणागिरी परिसरात बेकायदेशीर राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण वाढले आहे .अनेक घुसखोर बांगलादेशी बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय असल्याचे पुरावे सादर करून वर्षानुवर्ष शहरात वास्तव्यास आहेत. तसेच या घुसखोराक़डून सरकारी योजनांचे लाभ घेण्यात येत आहेत हे पोलिसांनी केलेल्या कारवाईत उघड झाले आहे. मात्र या घुसकोरी बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्यासाठी संपूर्ण राज्यभरात मोहीम हाती घेण्यात आली आहे.उरण द्रोणागिरीमधून सात बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे.याबद्दल सविस्तर माहिती अशी की, उरण द्रोणागिरी रोड येथील "गामी" या इथल्या ठेकेदारांनी बांगलादेशी कामगार कामावर ठेवल्याचे उरण पोलिसांना माहिती मिळाली आहे. यामुळे उरण पोलिसांनी सापळा रचून साइटवर काम करत असलेल्या बांगलादेशी ची तपासणी केली असता सात कामगार आढळून आले या घुसकरांकडून आधार कार्ड पॅन कार्ड आदी कागदपत्रे जप्त करण्यात आले असून अधिक तपास उरण पोलीस करत आहेत नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बिल्डिंगचे काम चालू आहेत यामध्ये कामगारांची गरज आहे तेव्हा असे कामगार मागवले जातात मागील वर्षी देखील नवी मुंबईत पोलीस ठाणे अंतर्गत केलेल्या मोहिमेत अनेक बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आले होते. उरण परिसरात बांगलादेशींच्या अवैध वास्तव्यामुळे राज्य व देशावर होणाऱ्या परिणाम तसेच वाढत्या गुन्हेगारीचा त्रास मात्र सामान्य नागरिकांना होते आहे. लवकरात लवकर पकडून त्यांना त्यांच्या मायदेशात पाठवावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**उरण द्रोणागिरी मधील गामी ग्रुपच्या बांधकाम साईटवरील घुसखोरांना अटक**




## पनवेलमध्ये संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** -शहरातील रोहिदास वाडा येथे चर्मकार समाज प्रतिष्ठान रायगडच्यावतीने संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती मोठ्या भक्तिमय वातावरणात व उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी रोहिदास वाडा येथील समाज मंदिर उभारण्यासाठी विशेष योगदान देणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्याप्रती आभार मानत जयंतीचे औचित्य साधून चर्मकार समाजाच्या वतीने विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांना अभिवादन करून आपले विचार व्यक्त केले. महिलांसाठी हळदीकुंकू व तसेच प्रसिद्ध बुवा गणपत बुवा म्हात्रे यांच्या भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष विजय मोहोकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी नगरसेविका दर्शना भोईर, रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे माजी




अध्यक्ष अरविंद सावळेकर, कामगार नेते संजय भगत, माजी नगराध्यक्ष अड जगदीश उरणकर, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, रेणुका मोहोकर, पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे माजी अध्यक्ष अड गजानन करावकर, विलास मोहोकर, रमाकांत गरुडे, नरेंद्र गायकवाड, विजय गायकवाड, अनिल जाधव, संजय जाधव, अजय जाधव, के. डी. आंबोलकर, लक्ष्मण कल्याणकर, शशिकांत मोहोकर, रामनाथ आंबोलकर, प्रवीण मोहोकर, दिनकर गव्हाणकर, विलास उरणकर, महेंद्र उरणकर, विनायक माने, बाळकृष्ण गरुडे, बाबू कल्याणकर, जीवन उरणकर, मधुकर उरणकर, सुनील सावर्डेकर, किशोर मोहोकर, सुनील मोहोकर, दिनेश भोसकर व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यासाठी पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष विजय मोहोकर, प्रवीण मोहोकर, भूषण कल्याणकर, सचिन उरणकर अतिश मोहोकर व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## धाटाव कुंडलिका नदीत केमिकल युक्त दुषित पाण्यामुळे मासे मृत होण्याचे प्रकार

**दैनिक युवक आधार**
**किरण मोरे** -रोहा औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यांचे केमिकलयुक्त सांडपाणी कुंडलिका नदीत सोडले जात असल्यामुळे, या केमिकलयुक्त दुषित पाण्यामुळे मासे मृत होण्याचा धक्कादायक प्रकार घडू लागला असून मत्स्यव्यवसाय बंद पडल्यामुळे मच्छिमार बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे. याप्रकरणी तातडीने येत्या आठ दिवसांत कारवाई न झाल्यास व मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई न मिळाल्यास येत्या २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता २० गावांतील कोळी बांधव धाटाव येथील सी.ई.टी.पी. प्लँट वर धडकतील व तेथे होणाऱ्या नुकसानीस संबंधित कार्यालयातील अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा कोळी महासंघाचे सल्लागार तथा दक्षिण रायगड जिल्हा संपर्क प्रमुख सुर्यकांत वाघमारे यांनी रोहा उपविभागीय अधिकारी, तसेच संबंधित सर्व शासकीय कार्यालयांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.उपासमारीची वेळ आल्याच्या तक्रारी कुंडलिका नदीच्या दोन्ही तिरावरील मच्छीमार बांधवांनी केलेल्या आहेत. यासंदर्भात वेळोवेळी तहसिल कार्यालयात संयुक्त सभा घेवुन, त्या त्या यंत्रणेला सूचना देण्यात येवून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, परंतू तसे झालेले नाही. ३ डिसेंबर २०२४ रोजी समस्त कोळी बांधव, त्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मत्स्य खाते यांची सभा आयोजित केली होती. सदर सभेस श्री रामेशदादा पाटील, माजी आमदार व राष्ट्रीय अध्यक्ष कोळी महासंघ हे उपस्थित होते. सदर सभेत सर्वानुमते तात्काळ मत्स्य खात्या कडून होडी परवाने, व पारंपारीक पध्दतीने मत्स्य व्यवसाय करणारे यांची तपासणी, चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु आजपर्यंत यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. दुषित पाणी दररोज सोडले जात आहे, त्यामुळे मच्छीमार कोळी बांधवांचे प्रचंड नुकसान होत आहे व रोजगार नष्ट झाला असुन, उपासमारीची वेळ आलेली आहे. यासंदर्भात येत्या आठ दिवसांत कोणतीही कारवाई झाली नाही, तर आम्ही २० गावातील कोळी बांधव २७ फेब्रुवारी २०२५ रोजी, सकाळी ११ वाजता धाटाव येथील सी.ई.टी.पी. प्लँट मध्ये जाऊन तोडफोड करण्यांत येईल, तसेच खारगांव नदी किनारी जिथे कुंडलिका नदीच्या पात्रात दुषित पाणी सोडले जाते, ती पाईपलाईन सुद्धा उखडुन फेकुन देण्यात येईल व त्यामुळे होणारे सर्व नुकसानीस व परिणामांस संबंधित कार्यालयातील अधिकारी व प्रशासन जबाबदार रहातील याची नोंद घ्यावी, असा इशारा सुर्यकांत वाघमारे यांनी दिला आहे.

**मच्छिमार बांधवांवर उपासमारीची वेळ**

